# सोलापूर महानगरपालिका
## सभेचा इतिवृत्तांत
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )
## उप-समिती बैठक क्रमांक -२१

सोलापूर महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सोलापूर महानगरपालिकेची **मा.उप-समिती बैठक क्रमांक २१** मधील खालील विषया बाबतचे प्रस्ताव विभागाकडून प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.३.०६.२०२२ रोजी उपसमिती बैठक क्र.२० संपलेनंतर मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.

सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्रीमती विद्या पोळ | उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक |
| ५ | मा.श्री.श्रीराम पवार | सहा.आयुक्त, मालमत्ता कर विभाग |
| ६ | मा.श्री.विक्रमसिंह पाटील | सहा.आयुक्त, भू व मा. |
| ७ | मा.डॉ.बसवराज लोहार | आरोग्याधिकारी |
| ८ | मा.श्री.संदिप कारंजे | नगरअभियंता |
| ९ | मा.श्री.संजय धनशेट्टी | सार्व.आरोग्य अभियंता |

नगरसचिव -- या सभेत एकुण ८ विषय तातडीचे म्हणून घ्यावायाचे आहेत याची ई-४६२४६, ६१३३०, ५४३५३, परिवहन समिती संदर्भ ऑफलाईन,ई-३६१५३, ६४११४, ६४११२, ६४२५० हे क्रमांक आहेत.
मा.अति.आयुक्त -- ठिक आहे. दाखल करून घ्यावेत व विषयास सुरुवात करा.

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | ३८ | इलेक्ट्रीक वाहन धोरण - २०२१ इलेक्ट्रीक वाहनाकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थातील नागरीकांना/गृहनिर्माण संस्थाना त्यांच्या मालमत्ता करात सुट देणे कामी शासननिर्णय क्र.एमयुएम-२०२१ प्र.क्र. १३४/नवि-१७ मंत्रालय मुंबई दि.२०/०८/२०२१ नुसार मालमत्ता करामध्ये सुट देणे बाबत निर्णय होणेकामी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.३०/०५/२०२२ च्या (ok send to committee) आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे मान्यतेस्तव आलेले प्रकरण (ई-६२०१८) TAX | सहा.आयुक्त | १) स्वतःच्या इलेक्ट्रीक वाहनाकरीता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातुन इलेक्ट्रिक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, मालमत्ता करात कराच्या २ % सुट देण्यात यावी तथापी रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मालमत्ता धारकांनी घ्यावी.<br>२) गृहनिर्माण संस्थामध्ये सामाईक सुविधा अंतर्गत सदस्यांना इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास खालीलप्रमाणे मालमत्ता करात सुट देणेस मान्यता देणेत येत |

MS MCA Add MC

पान १/८
उस.२१ ३/६/२२

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आहे.<br>अ) गृहनिर्माण संस्थेमधील २०% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास १% सुट,<br>ब) गृहनिर्माण संस्थेमधील ४०% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास २% सुट,<br>क) गृहनिर्माण संस्थेमधील ६०% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास ३% सुट,<br>ड) गृहनिर्माण संस्थेमधील ८०% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास ४% सुट,<br>इ)गृहनिर्माण संस्थेमधील १००% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास ५% सुट,<br>३)गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्वावर इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा मुळ पार्किंग वगळता अन्य मोकळ्या जागेत केल्यास, मात्र आपातकालीन कामाकरीता ही जागा अडचणीचे असू नये. सदर मोकळ्या जागेचा वापर व्यापारी कारणाकरीता होणार असला तरी त्या जागेकरीता व्यापारी दरांने मालमत्ता कराची आकारणी न करता ते घरगुती दराने करण्यास मान्यता देणेत येत आहे. |
| २ | ३९ | सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत दरवर्षी मिळकत दारांना घरपोच मिळकत कराची बिले मनपा कर्मचाऱ्यांमार्फत वाटप करण्यात येतात. प्रस्तावात नमूद प्रमाणे सदरची बिले हि छपाई करून वाटप करण्यासाठी साधारणत: २ ते ३ महिन्याचा कालावधी लागतो. शासनाने डिजिटल इंडिया अंतर्गत सर्व सेवांचे संगणकीकरण करण्याच्या सुचना दिलेल्या असून त्या अनुषंगाने e-bill e-mail द्वारे दिल्यास Go green उपक्रमात चालणा मिळू शकते मालमत्ता कर विभागामार्फत वार्षिक छपाई बिला ऐवजी मिळकत दार यानी e-bill ची मागणी केल्यास e-bill उपलब्ध करून दिल्यास मिळकत करात रु.१००/- सवलत देणेस प्रस्तावित करण्यात आले असता, मा.आयुक्त यांनी (it is necessary in the view of environment as well as it will save time for distribution as well as collection. Send to committee) असे आदेश पारित केले आहे. यानुसार प्रकरणी मा.सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची | सहा.आयुक्त | प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. |

MS MCA Add MC 28 3/6/22

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.३०/०५/२०२२ च्या आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे मान्यतेस्तव आलेले प्रकरण द्वारे पाठविल्यास संबंधीत मिळकतदाराच्या मालमत्ता करामध्ये (ई-६३९६५) TAX | | |
| ३ | ४० | सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत अवैध्य इमारीतीवर शास्ती लावणे अनुषंगाने प्रस्तावात नमूद प्रमाणे<br>१) अवैध बांधकामावर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम शास्ती लावणे<br>२) बांधकाम परवानगी घेतला आहे मात्र वापर परवाना न घेतलेल्या मालमत्ता कराच्या ५०% रक्कम शास्ती लावणे<br>३) ज्या मिळकतीचा ज्या वापरासाठी बांधकाम खात्यासाठी परवानगी घेतली आहे व त्यानंतर त्याचा वापरात बांधकाम खात्याची परवानगी न घेता बदल केला असल्यास त्या मिळकतीवर मालमत्ता करांच्या ५०% शास्ती लावणे<br>४) बांधकाम परवानगी क्षेत्रापेक्षा वाढीव बांधकाम केल्यास वाढीव बांधकामाच्या क्षेत्रावर मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती लावणे<br>असे प्रस्तावित प्रमाणे सदर शास्तीचे अमंलबजावणी पूढील आर्थिक वर्षापासून लागू करणेस धोरणात्मक निर्णयाकरीता मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.३०/०५/२०२२ च्या (ok send to committee) आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेले प्रकरण (ई-६३६२९) TAX | सहा.आयुक्त | प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. |
| ४ | ४१ | जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत विकास कामांची शहर व हद्दवाढ भागातील सर्व भागात सर्वांगीण व समतोल विकास होणच्या दृष्टीने ठराव क्र.५०४ दि.१७/०२/२०२२ पारित ठरावातील अ.क्र. १ ते १२० कामाचे यादीतील कामांना त्यापुढे दर्शीवलेल्या रकमांना तसेच सदर कामांच्या पुर्वगणनपत्रकास सर्वसाधारण सभेची मान्यता मिळालेली आहे अजून सदरचे ठरावतील यादीतील १२० कामांपैकी प्रस्तावात नमूद २५ कामे तांत्रिक बाबीमुळे रद्द करून उर्वरित ९५ कामे हाती घेणेस तसेच प्रशासनाकडून नव्याने प्रस्तावित केल्याप्रमाणे एकूण २४ कामे असे समाविष्ठ करून एकुण ११९ कामांचे यादी बदलास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. याप्रमाणे मा.आयुक्त यांचेकडे सादर केले असता, यावर माननियांनी (ok send to committee) असे आदेशीत करून मा.आयुक्त यांचे दि.०१/०६/२०२२ रोजीच्या मान्यतेने आलेल्या प्रस्तावास, उपरोक्त ठराव क्र.५०४ दि.१७/०२/२०२२ या ठरावातील यादीतील एकणु १२० कामांपैकी २५ कामे रद्द करणेस व त्याऐवजी मा.प्रशासनाने सुचविणेत आलेली २४ कामांना मान्यता मिळून उर्वरित ९५ कामे व २४ कामे एकत्रित अशी ११९ कामांना मान्यता मिळणेकामी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या | नगरअभियंता | प्रस्तावित प्रमाणे देणेत येत आहे. |

MCA

Addl MC

उमआ २५ उ१८१

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.०१/०६/२०२२ च्या (ok send to committee) आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे **मान्यतेस्तव** आलेले प्रकरण (ई-४७९६८) CE | | |
| ५ | ४२ | लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता कामे मा.ना.पालकमंत्री, महोदय, मा.खासदार, मा.आमदार शहर उत्तर, मा.आमदार शहर मध्य, मा.आमदार शहर दक्षिण यांनी लेखी पत्राद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटी अंती सुचविण्यात आलेली कामे व तसेच प्रशासकीय प्रस्तावित करण्यात आलेली कामाची यादी मधील एकुण १९५ कामांच अंदाजित रक्कम रु.५१८८.९६ लाख इतक्या रकमेची कामे सोबत जोडलेली आहे. त्या अनुषंगाने कामाचे निवळ व निश्चिती ठरवून मिळण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे सादर करणेकामी मा.आयुक्त यांच्या स्वाक्षरीने दि.०१/०६/२०२२ अन्वये सादर करण्यात आलेले आहे.<br>सदरच्या यादीतील अनुक्रमित कामांस व सदर कामापोटी तयार करण्यात येणाऱ्या सविस्तर पुर्वगणनपत्रकास सक्षम मान्यता देण्यात येत असून उक्त योजनेतील मा.शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सविस्तर कामाचे परिपूर्ण प्रस्ताव सन २०२२-२०२३ करीता मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, सोलापूर यांचेकडे सादर करणेस मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीची आवश्यकता आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.०१/०६/२०२२ च्या (ok send to committee) आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे मान्यतेस्तव आलेले प्रकरण (ई - ६३८११) CE | नगरअभियंता | प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. |
| ६ | ४३ | सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मलनित्सारण नलिका व मॅनहोल चेंबरची सफाई अधुनिक यंत्राच्या सहाय्याने करणे कामी प्रस्तवात नमूद प्रमाणे बजेट तरतुदीस, नोट क्र.१९ मध्ये नमूद हि यंत्रणा खरेदी न करता ७ वर्षे भाडेतत्वावर प्रत्येक वर्षी एकच दराने राबविणे कामी प्रस्तावित नूसार सदर कामास ७ वर्षाकरीता साधारणपणे ६.७२ कोटी खर्च अपेक्षित आहे, तसेच मनपा हद्दीतील ड्रेनेजलाईन व चेंबरच्या साफसफाई करीता अत्याधुनिक पध्दतीचे एक सक्शन कम जेटिंग वॉटर रियासकलींग यंत्रणा ही भाडे तत्वावर राबविणेकरीता प्रस्तावात नमूद प्रमाणे माननियांच्या कडे सादर केले असता नोट क्र.२२ मध्ये मा.अति.आयुक्त यांनी The proposal to call teners to appoint an agency for cleaning of drainage lines and chambers as proposed by PHE needs approval of GB. As GB is not force now, the proposal is submitted to put up before Hon.administrator through the Sub -committee for approval असे नमूद करून मा.आयुक्तांकडे प्रस्तावित केले असता, मा.आयुक्त यांनी ok send to committee असे आदेशीत | सार्व.आरोग्य अभियंता | प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. |

MS MCA Add MC

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | केले यानुसार प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या मान्यतेस्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.०२/०६/२०२२ च्या आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांची उक्त प्रस्तावास **मान्यतेस्तव** आलेले प्रकरण. (ई-६३२०५) PHE | | |
| ७ | ४४ | टि.पी ४ फा.प्लॉ ६९ येथील पूणे नाकाची मनपा मालकीची ४००० चौ.मि. इतकी जागा गोदामे उभे करणेसाठी मोकळ्या जागा भाडेपट्ट्याने देणेकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रस्तावित केलेनुसार नमूद शर्ती अटीनुसार सदरची जागा २९ वर्षे ११ महिने मुदतीची करार करून भाडेपट्ट्याने देणेकामी जाहिरप्रसिध्दीकरण करून ई-निविदा मागविणेकामी प्रस्तावात नमूद अटी व शर्तीनुसार मा.प्रशासक यांची मान्यतेस्तव नोट क्र.१५ नुसार सादर केले असता, यावर मा.आयुक्त यांनी This land is open and prone to encroachment, so float tender to implement the reservation as per DP. It will secure the area and also give additional income to SMC. Send to committee असे आदेश मा.आयुक्त यांनी दि.०२/०६/२०२२ ने दिलेले आहे. यानुसार प्रस्तावित प्रमाणे प्रक्रिया राबविणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या मान्यतेस्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.०२/०६/२०२२ च्या आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांची उक्त प्रस्तावास **मान्यतेस्तव** आलेले प्रकरण. | सहा.आयुक्त, भु व मा. | प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. |
| ८ | तात१/ ४५ | भवानीराम सिकची धर्मशाळा येथे विविध दुरुस्तीचे कामाचे पूर्वगणन पत्रक तयार करण्यात आले असून त्याची र.रु.३८,९२,८७१.०० इतकी आहे. तरी सदर कामास निधिची तरतूद आहे. सदर कामाचे पूर्वगणन पत्रकास मा.स्थापत्य समितीची मान्यता होऊन मा.सर्वसधारण सभेची मान्यता मिळणेस विनंती आहे. परंतू सध्या मा.स्थापत्य समिती व मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन, शासन आदेश नवि-१४ दि.०३/०३/२०२२ नुसार प्रशासकिय पदी मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांची नियुक्ती करण्यात आलेली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मा.प्रशासक यांच्याकडे मंजूरीस्तव पाठविणेकामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमिती यांचे मार्फत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.स्थापत्य समिती ठराव क्र.६ दि.०३/०६/२०२२ च्या शिफारसीने मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव आलेले प्रकरणी मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने प्रस्तावित प्रमाणे मा.प्रशासक यांची मान्यता मिळणेकामी आलेले प्रकरण (ई-४६२४६) | नगरअभियंता | सदर भवानीराम सिकची धर्मशाळा ट्रस्ट आहे कामासाठी लागणारा निधी हा ट्रस्टचा आहे तथापी महानगरपालिकेच्या अखत्यारित असल्याने मा.स्थापत्य समिती संदर्भ मा.प्रशासक ठराव क्र.६ दि.०३/०६/२०२२ च्या शिफरशीनुसार मान्यता देण्यात येत आहे |

MS MCA Add MC 3.11.22 5/e 3/6/22

<table>
<tr>
<td>९</td>
<td>तात<br>२/४६</td>
<td>महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथील खालील नमूद कामाचे पूर्वगणनपत्रक
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>कामाचे नाव</th><th>पूर्वगणनपत्रक र.रु</th></tr>
<tr><td>१</td><td>महात्मा गांधी प्राणी संग्रहालाय येथे किचन व स्टोअर बांधणे</td><td>४५,९१,५१६/-</td></tr>
<tr><td>२</td><td>महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे अर्धवट स्वरुपातील राहिलेले संरक्षक भिंत (बाहेरील) व चेनलिंक फेन्सींगचे काम करणे</td><td>३८,८८,४८१/-</td></tr>
<tr><td>३</td><td>महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे व्हेटरनरी हॉस्पिटल बांधणे</td><td>१,३१,०३,५०३/-</td></tr>
</table>
वरील ३ पूर्वगणनपत्रकास नगरअभियंता यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सदर पूर्वगणनपत्रकास मा.स्थापत्य समितीची मान्यता देऊन मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. आजला दोन्ही समिती अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नियुक्ती असल्याने मा.प्रशासक यांचे मान्यतेसाठी उपसमितीकडे मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.स्थापत्य समिती ठराव क्र.७ दि.०३/०६/२०२२ च्या शिफारसीने मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव आलेले प्रकरणी मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे नोट क्र.१० नमूद नुसार तरतुदीस मान्यता व प्रस्तावित प्रमाणेस मा.प्रशासक यांची मान्यता मिळणेकामी आलेले प्रकरण (ई-६१३३०)</td>
<td>नगरअभियंता</td>
<td>मा.स्थापत्य समिती संदर्भ मा.प्रशासक ठराव क्र.७ दि.०३/०६/२०२२ च्या शिफरशीनुसार मान्यता देण्यात येत आहे</td>
</tr>
<tr>
<td>१०</td>
<td>तात<br>३/४७</td>
<td>शहर हद्दीतील व हद्दीबाहेर २० किमी परिक्षेत्रात प्रति किमी दराने बसमार्ग रॉयल्टी (स्वामित्वधन) पध्दतीने चालविणेस धोरणात्मक निर्णय होऊन मा.परिवहन समितीमध्ये पारित झालेला ठराव क्र.२७ दि.१०/०१/२०२२ व मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४१८ दि.२१/०१/२०२२ सदर दोन्ही ही ठराव विखंडीत करणे करीता मा.प्रधानसचिव, नगरविकास विभाग,मुंबई यांचेकडे दि.१५/०४/२०२२ रोजी पाठविणेत आलेले आहे. यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. प्रस्तावात नमूद प्रमाणे आजला सदरचा ठराव होऊन ९० दिवसापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) प्रकरण २ नियम १ (र) नुसार मा.आयुक्तांच्या आदेशानुसार प्रकरण मा.परिवहन समिती व मा.सर्वसाधारण सभेकडे प्रकरण फेरसादर केले आहे.<br><br>प्रकरणी सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे शहर हद्दीतील व हद्दीबाहेरील २० किमी परिक्षेत्रात येणारे शहर व ग्रामिण भागातील बस मार्गाचे पूर्व विभाग पश्चिम विभाग, दक्षिण विभाग व उत्तर विभाग असे ४ स्वतंत्र विभाग तयार करण्यात आलेले आहेत. पूर्व विभाग शहर बससेवा वगळून पश्चिम विभाग, दक्षिण विभाग व उत्तर विभाग या तीन विभागाचे निविदा काढून त्याप्रमाणे प्रति किमी दराने रॉयल्टी (स्वामित्वधन) एस.एम.एफ. (सिस्टीम मॅनेजमेंट फी) तत्वावर चालविणेकरीता खाजगीकरण पध्दतीने बस वाहतूक मार्ग नागरीकांना उपलब्ध करून देणे बाबतची योजना राबविणेस व योजने करीता टेंडर प्रक्रिया राबविणे करीता धोरणात्मक निर्णय होऊन मिळणे करीता मा.परिवहन समितीच्या मान्यतेने मा. सर्वसाधारण सभेच्या धोरणात्मक मान्येतस्तव पाठविणे आवश्यक आहे . परंतू सध्या मा.परिवहन समिती व मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन, शासन</td>
<td>उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक</td>
<td>मा.परिवहन समिती संदर्भ मा.प्रशासक ठराव क्र.१ दि.०३/०६/२०२२ च्या शिफारशीनुसार प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.</td>
</tr>
</table>

<table>
<tr><td></td><td></td><td>आदेश नवि-१४ दि.०३/०३/२०२२ नुसार प्रशासकिय पदी मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांची नियुक्ती करण्यात आलेली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मा.प्रशासक यांच्याकडे मंजूरीस्तव पाठविणेकामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमिती यांचे मार्फत मा.परिवहन समिती व मा.सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता मिळणेकामी मा.उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दि.२८/०५/२०२२ च्या मान्यतेने उपसमितीकडे आलेले प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मा.परिवहन समिती ठराव क्र.१ दि.०३/०६/२०२२ चे शिफारशीनुसार प्रस्तावित प्रमाणे धोरणात्मक मान्यतेस्तव आलेले प्रकरण (E-५४३५३)</td><td></td><td></td></tr>
<tr><td>११</td><td>तात/४/४८</td><td>सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील ४० बसेसचे अंतरबाह्य जागेवर जाहिरातीचा मक्ता निश्चित करणे कामी दि.२८/१०/२०२१ रोजी निविदा मागविण्यात आल्या यामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या याचा दराचा तक्ता खालीलप्रमाणे असे<br>
<table>
<tr><td>वर्ष</td><td>परिवहन उपक्रमाकडील निश्चित केलेले दर प्रति बस प्रति माह</td><td>प्रभा मेडिया यांनी दिलेले प्रति बस प्रति माह चे दर</td><td>प्रचार इंन्फ्रा अँड आऊटडोअर प्रा.लि यांनी दिलेले प्रति बस प्रति माह दर</td><td>सफिरे मेडिया सर्व्हिसेस यांनी दिलेले प्रति बस प्रति माह दर</td></tr>
<tr><td>प्रथम वर्ष</td><td>र.रु.२११२/- + GST</td><td>र.रु.१२००/- + GST</td><td>र.रु.२१५०/-+ GST</td><td>र.रु.१७९५/- + GST</td></tr>
<tr><td>द्वितिय वर्ष १० % वाढ</td><td>र.रु.२३२४/- + GST</td><td>र.रु १३२०/- + GST</td><td>र.रु.२३५०/- + GST</td><td>र.रु.१९७५/-+ GST</td></tr>
</table>
प्राप्त जास्तीचे दराचे निविदाधारक प्रचार इंन्फ्रा अँड आऊटडोअर प्रा.लि. यांचे वर तक्त्यात नमूद प्रमाणेचे दर ४० बसेस वरील अंतरबाह्य जाहिरातीचा मक्ता निश्चित करून काम करून घेणेस व कार्यारंभ आदेश दोन वर्षा कालावधी करीता देणेस, करारपत्र करणेस मा.परिवहन समितीची मान्यता होऊन मा.सर्वसाधारण सभेची आवश्यक आहे परंतू सध्या मा.परिवहन समिती व मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन, शासन आदेश नवि-१४ दि.०३/०३/२०२२ नुसार प्रशासकिय पदी मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांची नियुक्ती करण्यात आलेली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मा.प्रशासक यांच्याकडे मंजूरीस्तव पाठविणेकामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमिती यांचे मार्फत मा.परिवहन समिती व मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दि.३१/०५/२०२२ च्या</td><td>उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक</td><td>मा.परिवहन समिती संदर्भ मा.प्रशासक ठराव क्र.२ दि.०३/०६/२०२२ च्या शिफारशीनुसार प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.</td></tr>
</table>

MCA

3.11.29

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मान्यतेने उपसमितीकडे आलेले प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मा.परिवहन समिती ठराव क्र.२ दि.०३/०६/२०२२ चे शिफारशीनुसार प्रस्तावित प्रमाणे धोरणात्मक मान्यतेस्तव आलेले प्रकरण (ऑफलाईन) | | |
| १२ | तात ५/४९ | गुरुनानक चौक ते बोरामणी नाकापर्यंत खड्डे दुरुस्त करणे व अशोक चौक पोलीस स्टेशन मागे पावसाळी पाईपलाईन घालणे कामी पूर्वगणनपत्रक र.रु.४१,१२,१०८/- यास शहरअभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार प्रकरणी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे कामी मा.स्थापत्य समिती ठराव क्र.८ दि.०३/०६/२०२२ च्या शिफारशीनुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नियुक्ती असल्याने मा.प्रशासक यांची प्रस्तावित प्रमाणेस मान्यतेसाठी उपसमितीकडे पाठविणेकामी मा.स्थापत्य समितीकडून आलेले प्रकरण. (ई-३६१५३) | नगरअभियंता | मा.स्थापत्य समिती संदर्भ मा.प्रशासक ठराव क्र.८ दि.०३/०६/२०२२ च्या शिफारशीनुसार प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. तथापी नॅशनल हायवे विभागाशी समन्वय साधुन आवश्यक ती परवानगी घेऊन नगर अभियंता यांनी कार्यवाही ठेवावी |
| १३ | तात ६/५० | सोलापूर शहरातील मिळकतीवर बसविण्यात आलेल्या विविध व्यासांच्या नळावरील वॉटर मिटरचे सोलापूर महानगरपालिका ठरवेल त्याप्रमाणे त्यांच्या रिडिंग नोंदी घेणे, सोलापूर महानगरपालिकेस त्याचा रेकॉर्ड वेब ॲप्लिकेशन तसेच ईतर माध्यमातून अद्यावत ठेवणे, वॉटर मिटर बिलिंग कलेक्शन करणे व ते सोलापूर महानगरपालिकेत वेळचे वेळी जमा करणे सदरच्या कामाकरीता आवश्यक मनुष्यबळाचा पुरवठा करणेकामी ०५ वर्ष कालावधी करीता ई-निविदा प्रक्रिया राबविणेस, मा.प्रशासक यांची मान्यता मिळणे कामी उपसमितीकडे मा.आयुक्त यांचे दि.०३/०६/२०२२ रोजीच्या मान्यतेने आलेले प्रकरण (ई-६४११४) | सार्व.आरोग्य अभियंता | प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. ८ झोनचे ८ भाग करण्यात यावे व त्याप्रमाणे टेंडर देण्यात यावे. |
| १४ | तात ७/५१ | सोलापूर शहरातील सर्व मिळकतीवर अल्ट्रासोनिक AMR meter (Automated Meter reading) अथवा डोमेस्टिक मल्टीजेट मेकॅनिकल वॉटर मिटरचा पुरवठा करून घरगुती, बिगर घरगुती व औद्योगिक नळांना बसविणे, त्याची ०५ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणे, त्यासाठी आवश्यक वर्कशॉप, कॅलिब्रेशन, सेंटर व तक्रार निवारण्यासाठी कॉल सेंटरची स्थापना करणेसाठी NRW कमी करणे कामी आवश्यक मनुष्यबळ व साधनांचा पुरवठा करणे इत्यांदी कामी एजंन्सीचे पॅनल नेमणे बाबत निविदा मागविणेस मा.प्रशासक यांची मान्यता मिळणे कामी उपसमितीकडे मा.आयुक्त यांचे दि.०३/०६/२०२२ रोजीच्या मान्येतेने आलेले प्रकरण (ई-६४११२) | सार्व.आरोग्य अभियंता | मक्तेदारांचे empanelment करण्यात यावे, प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | तात ८/५२ | सोलापूर महानगरपालिकेच्या रुग्णालयासाठी लाँड्री मशीन खरेदी करणे कामी महाराष्ट्र सुवर्णजयंती योजना नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अनुदान उपलब्ध होऊन मिळणे बाबत प्रस्तावात नमूद सोलापूर महानगरपालिकेच्या रुग्णालयातून सुमारे ४०० ते ४५० रुग्ण दररोज उपचार घेतात व ४० ते ५० शस्त्रक्रिया होतात. यांचे कपड्याची स्वच्छता करणे कामी लाँड्रीमशीन व त्याअनुषंगीक साहित्य खरेदी कामी अंदाजे इस्टिमेट र.रु.८४,००,०००/- इतकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत अनुदान प्राप्त होणेकामी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने, मा.प्रशासक यांची मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचेकडून दि.०३/०६/२०२२ चे मान्यतेने आलेले प्रकरण ई-६४२५० | आरोग्य विभाग | महाराष्ट्र सुवर्णजयंती योजना नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत अथवा नाविण्यपूर्ण योजने अंतर्गत सदर योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे. |

मा.सार्व आरोग्यअभियंता
सोलापूर महानगरपालिका

मा.आरोग्याधिकारी
सोलापूर महानगरपालिका

मा.नगरअभियंता
सोलापूर महानगरपालिका

मा.सहा.आयुक्त (भु व मा)
सोलापूर महानगरपालिका

मा.सहा.आयुक्त (टॅक्स)
सोलापूर महानगरपालिका

मा.उपायुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
सोलापूर महानगरपालिका

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

मा.मुख्यलेखापरिक्षक
सोलापूर महानगरपालिका

मा.अतिरिक्त आयुक्त
सोलापूर महानगरपालिका सोलापूर

पान ८।८
३.४१ २९ ३।६।२२

**सोलापूर महानगरपालिका**
**प्रशासक ठराव**
**विषय क्र.३८ ठराव क्र.३८ दिनांक. ०३/०६/२०२२**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )**

३८

इलेक्ट्रीक वाहन धोरण - २०२१ इलेक्ट्रीक वाहनाकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थातील नागरीकांना/गृहनिर्माण संस्थाना त्यांच्या मालमत्ता करात सुट देणे कामी शासननिर्णय क्र.एमयुएम-२०२१ प्र.क्र. १३४/नवि-१७ मंत्रालय मुंबई दि.२०/०८/२०२१ नुसार मालमत्ता करामध्ये सुट देणे बाबत निर्णय होणेकामी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.३०/०५/२०२२ च्या (ok send to committee) आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे मान्यतेस्तव आलेले प्रकरणी **१)स्वत:च्या इलेक्ट्रीक वाहनाकरीता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातुन इलेक्ट्रिक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, मालमत्ता करात कराच्या २% सुट देण्यात यावी तथापी रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मालमत्ता धारकांनी घ्यावी. २) गृहनिर्माण संस्थामध्ये सामाईक सुविधा अंतर्गत सदस्यांना इलेक्ट्रीक वाहन चार्जिगची सुविधा उपलब्ध केल्यास खालीलप्रमाणे मालमत्ता करात सुट मान्यता देणेत येत आहे. अ) गृहनिर्माण संस्थेमधील २०% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास १% सुट, ब) गृहनिर्माण संस्थेमधील ४०% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास २% सुट क) गृहनिर्माण संस्थेमधील ६०% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास ३% सुट, ड) गृहनिर्माण संस्थेमधील ८०% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास ४% सुट, इ) गृहनिर्माण संस्थेमधील १००% घरांमध्ये इलेक्ट्रीक वाहन असल्यास व याठिकाणी चार्जिंग होत असल्यास ५% सुट ३) गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्वावर इलेक्ट्रीक वाहन चार्जिगची सुविधा मुळ पार्किंग वगळता अन्य मोकळ्या जागेत केल्यास, मात्र आपातकालीन कामाकरीता ही जागा अडचणीचे असू नये. सदर मोकळ्या जागेचा वापर व्यापारी कारणाकरीता होणार असला तरी त्या जागेकरीता व्यापारी दराने मालमत्ता कराची आकारणी न करता ते घरगुती दराने करण्यास मान्यता देणेत येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका ★ मा.प्रशासक कार्यालय ★

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
### विषय क्र.३९ ठराव क्र.३९ दिनांक. ०३/०६/२०२२
### (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

३९

सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत दरवर्षी मिळकत दारांना घरपोच मिळकत कराची बिले मनपा कर्मचाऱ्यांमार्फत वाटप करण्यात येतात. प्रस्तावात नमूद प्रमाणे सदरची बिले हि छपाई करून वाटप करण्यासाठी साधारणत: २ ते ३ महिन्याचा कालावधी लागतो. शासनाने डिजिटल इंडिया अंतर्गत सर्व सेवांचे संगणकीकरण करण्याच्या सुचना दिलेल्या असून त्या अनुषंगाने e-bill e-mail द्वारे दिल्यास Go green उपक्रमात चालणा मिळू शकते मालमत्ता कर विभागामार्फत वार्षिक छपाई बिला ऐवजी मिळकत दार यानी e-bill ची मागणी केल्यास e-bill उपलब्ध करून दिल्यास मिळकत करात रु.१००/- सवलत देणेस प्रस्तावित करण्यात आले असता, मा.आयुक्त यांनी (it is necessary in the view of environment as well as it will save time for distribution as well as collection. Send to committee) असे आदेश पारित केले आहे. यानुसार प्रकरणी मा.सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.३०/०५/२०२२ च्या आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे मान्यतेस्तव आलेले प्रकरणास **प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

## सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.४० ठराव क्र.४० दिनांक. ०३/०६/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)

४०

सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत अवैध्य इमारीतीवर शास्ती लावणे अनुषंगाने प्रस्तावात नमूद प्रमाणे

१) अवैध बांधकामावर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम शास्ती लावणे

२) बांधकाम परवानगी घेतला आहे मात्र वापर परवाना न घेतलेल्या मालमत्ता कराच्या ५०% रक्कम शास्ती लावणे.

३) ज्या मिळकतीचा ज्या वापरासाठी बांधकाम खात्यासाठी परवानगी घेतली आहे व त्यानंतर त्याचा वापरात बांधकाम खात्याची परवानगी न घेता बदल केला असल्यास त्या मिळकतीवर मालमत्ता करांच्या ५०% शास्ती लावणे

४) बांधकाम परवानगी क्षेत्रापेक्षा वाढीव बांधकाम केल्यास वाढीव बांधकामाच्या क्षेत्रावर मालमत्ता कराच्या दुप्पट शास्ती लावणे

असे प्रस्तावित प्रमाणे सदर शास्तीचे अमंलबजावणी पूढील आर्थिक वर्षापासून लागू करणेस धोरणात्मक निर्णयाकरीता मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.३०/०५/२०२२ च्या (ok send to committee) आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे **धोरणात्मक मान्यतेस्तव** आलेले प्रकरणास **प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका